# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३९४-२२** **दिनांक २६/१२/२०२२**

## घरातील सामान शिफ्टींग करण्याच्या बहाण्याने संर्पक करुन सामान शिफ्टींग न करता मौल्यवान सामानाची चोरी करुन पळुन जाणा-या आरोपींच्या टोळीला जेरबंद. **वसई पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची उल्लेखनिय कामगिरी.**

दिनांक १९/१२/२२ रोजी ११.३० वा चे सुमारास विजया कॉ. एच.डी.एफ.सी. बँकेच्या बाजूला, नायगाव प. येथील फिर्यादी यांनी त्यांना घरातील सामान शिफ्टींग करावयाचे असल्याने लॉजीस्टीक मार्ट या साईटवरती मुव्हर्स ॲन्ड पॅकर्सबाबत चौकशी केली होती. त्यानंतर त्यांना बेस्ट कुरीयर सर्विस, बोरीवली येथुन बोलत असलेबाबत फोन आला. तेव्हा फार कमी किंमतीमध्ये सामान शिफ्टींग करीत असल्याने फिर्यादी यांनी बेस्ट कुरीयर ॲन्ड सर्व्हिस यांना सामान शिफ्टींग करणेकामी घरी बोलावले. दिं १९/१२/२२ रोजी सदर ४ इसम हे फिर्यादी यांच्या घरी आले व घरातील सामान पॅकींग करण्याचा बहाणा करुन घरातील दोन लॅपटॉप व बँकेचे चेकबुक घेवुन पळुन गेले. सदरबाबत वसई पोलीस ठाणेस गु.र.क्र . ३८२/२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना तपासादरम्यान बेस्ट कुरीयर सर्विस मधून म्हणुन संपर्क केलेल्या इसमाचा तसेच सामान पॅकींग करीता आलेल्या इसमांचा फोन बंद असल्याचे दिसुन आले. त्यांच्याबाबत अधिक माहिती प्राप्त करुन मिळालेल्या गोपनीय माहितीच्या व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी नामे १) रोशन ऊर्फ अश्वनी पप्पु पांडे, वय २० वर्ष , २) विपुल विनोद मिश्रा, वय २० वर्षे, ३) सौरभ रमेश यादव, वय २० वर्षे ४) संतोष कृष्णकुमार मिश्र, वय २६ वर्षे सर्व राहणार रुम नं. ०६, खैरमोडे चाळ, मुन्सीपल मराठी शाळेच्या पाठीमागे, टेबींपाडा, भांडुप (प), मुंबई ७८ यांना भांडुप, मुंबई येथुन ताब्यात घेण्यात आले. त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना नमूद गुन्हयात दिनांक २३/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीतांकडुन वर नमूद गुन्हयातील २ लॅपटॉप, चेकबुक याव्यतीरीक्त जे.जे मार्ग, मुंबई येथे दाखल असलेल्या गुन्हयातील ॲक्टिवा मो. स्कुटर असा मुद्देमाल व ४९ इंचाचे दोन एलईडी टिव्ही असा एकुण १,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### उघडकीस आणलेले गुन्हे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | वसई पोलीस ठाणे. | गु.र.क्र . ३८२/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि.सं. |
| २. | जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र.६७०/२०२२ कलम ४२०, ४०७ भा.दं.वि.सं. सह ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम. |
| ३. | मानपाडा पोलीस ठाणे, ठाणे | गु.र.क्र.९९३/२०२२, कलम ४२०,५०६,३४ भा.दं.वि.सं. |

अशाप्रकारे नमूद आरोपीतांकडून एकूण ३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून नमूद आरोपीतांनी कल्याण, डोंबिवली, विरार, मुंबई अशा अनेक ठिकाणी अशाचप्रकारे सामान शिफ्टींग करण्याच्या बहाण्याने लोकांच्या घरी जावुन चोरी केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्रीमती. पद्मजा बढे, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषिकेश पवळ पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सुनिल पवार, पो.ह. सुनिल मलावकर, मिलींद घरत, शरद पाटील, पो.शि. सुर्यकांत मुंढे, अक्षय नांदगावकर व पो.हवा. भालचंद्र बागुल नेमणुक पोलीस उपायुक्त कार्यालय परिमंडळ २ यांनी केलेली आहे.




---ooo---